# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०७/०२/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. कळमेश्वर** – दिनांक ०६/०२/२०२२ चे १७.३० वा. चे सुमारास पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत फिर्यादीयांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री मुंडे हे करीत आहे.

### पाण्यात बुडुन मृत्यु

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०५ किमी. क्रिष्णा नदी गणेशपूर शिवार येथे दिनांक ०७/०२/२०२२ चे १३.३० वा. दरम्यान **१) रिजवान जनकब खान वय ११ वर्ष, २) ईमामुल रुस्तम खान वय ०८ वर्ष दोन्ही रा. गणेशपूर** हे मुले आपआपल्या आई सोबतजळाउ काडया आणणेकरीता क्रिष्णा नदी गणेशपूर शिवारामध्ये गेले असता दोन्ही मुलाच्या आई काडया जमा करीत असतांना दोन्ही मुले नदीच्या पाण्यात आंघोळ करण्याकरीता उतरले असता पाणी खोल असल्याने पाण्यात बुडून मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रूस्तम अब्दुल अजीज खान, वय ३६ वर्ष, गणेशपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री कलेगूरवार मो.नं. ९१७५५७९१४३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर